## फौ. कि. अर्ज क्र. २३/२०२४ मधील नि.०६ वरील आदेश

### सीएनआर क्र. **MHRT**080002402024

०१. सदर अर्जाअन्वये सा.वाला यांच्या पेन्शमधुन दरमहा रक्कम रु. ५०००/– अर्जदार हीस देववीणे बाबत संबंधीत कार्यालय, मा. उपप्रमुख लेखापाल (शिक्षण निधी) बृहन्मुंबई महानगर पालीका, महानगर पालीका मुख्यालय, दुसरा मजला, मुंबई ४००००१ यांना आदेश करण्यात यावा. अशी विनंती अर्जदाराने केली.

०२. फौ.कि.अर्ज १०६/२०२२ च्या निकालाअन्वये सा.वाला याने अर्जदारास अर्ज दाखल तारखेपासून म्हणजे दि. १७/०६/२०२२ पासून वाढीव पोटगी रक्कम रु. २,०००/– म्हणजेच अर्जाच्या तारखेपासून दरमहा रक्कम रु. ५,०००/– पोटगी द्यावी. तसेच अर्जाच्या खर्चापोटी रु. ३,०००/– द्यावेत असा आदेश झालेला आहे.

०३. सा.वाला यांच्यावर बजावणी होऊन देखील ते न्यायालयात हजर झालेले नाहीत किंवा सदरची रक्कम भरण्याबाबत तयारी दर्शवली नाही. आजवर अर्जदार हीला सा.वालाच्या पगारातून व तो निवृत्त झाल्यानंतर त्याच्या निवृत्ती वेतनातुन पोटगी रक्कम न्यायालयीन आदेशाने वसुल होऊन मिळत आहे. सबब या अर्जाअन्वये अर्जदाराने रक्कम रु. ५४,०००/– वसून होऊन मिळणेसाठी तसेच या प्रकरणाचा अंतीम निकाल होईपर्यंतच्या काळातील रक्कम वसुल करण्यासाठी विनंती केली.

०४. मा. उपप्रमुख लेखापाल (शिक्षण निधी) बृहन्मुंबई महानगर पालीका, महानगर पालीका मुख्यालय, दुसरा मजला, मुंबई ४००००१ यांच्या मार्फत सा.वाला यांच्या कडुन देय असलेली पोटगीची रक्कम फौ.कि.अर्ज १०८/२०१६ च्या कामी जमा होत असल्याने त्याचा पुन्हा अहवाल मागवणे गरजेचे वाटत नाही. सबब

सा.वाला निवृत्त झाल्याने त्याच्या निवृत्ती वेतनातुन देय रक्कम रु. ५४,०००/- वसूल होऊन मिळण्याकरता दरमहा रु. ५,०००/- इतकी रक्कम अर्जदाराला देण्याबाबत त्यांना आदेशीत करणे आवश्यक वाटते. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

०१. अर्ज नि.०६ मंजूर करण्यात येतो.

०२. मा. उपप्रमुख लेखापाल (शिक्षण निधी) बृहन्मुंबई महानगर पालीका, महानगर पालीका मुख्यालय, दुसरा मजला, मुंबई ४००००१ यांना निर्देशित करण्यात येते की, सा.वाला राजाराम तानाजी गोसावी यांच्या निवृत्ती वेतनातुन माहे नोव्हेंबर २०२४ पासून पुढील दरमहा पोटगीची रक्कम रु. ५,०००/- इतकी रक्कम कपात करुन या न्यायालयाच्या पुढील आदेश होईपर्यंत जमा करावी.

०३. मा. उपप्रमुख लेखापाल (शिक्षण निधी) बृहन्मुंबई महानगर पालीका, महानगर पालीका मुख्यालय, दुसरा मजला, मुंबई ४००००१ यांना प्रस्तुतचा आदेश सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय देवरुख यांच्या मार्फत पत्राने पाठवावा.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.11.12 17:28:25 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – १२/११/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**